# जबरी चोरीचा गुन्हा १२ तासांत उघडकीस

19-2-2022

**नांदेड दि.१८ –** शहरातील विमानतळ पोलिस स्टेशनच्या पथकाने अवघ्या १२ तासात जबरी चोरी घटनेतील आरोपींना अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पोस्टे विमानतळ हद्दीतुन टेम्पो क्र. एमएच-२६/एच-४८४७ मध्ये देशी दारूचे बॉक्स भरून तामसा येथे देण्यासाठी निघाले असता नमस्कार चौक ते माळटेकडी ब्रिज मार्गे जात असतांना ग्यानमाता शाळेजवळ फिर्यादीचे ट्रकचे पाठीमागुन मो सा क्र एमएच-२६/वाय-८५६५ वर बसुन तीन अनोळखी आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे टेम्पो समोर मो सा आडवी लावुन टेम्पो बाजुला घे म्हणाले असता फिर्यादीने टेम्पो बाजुला घेतला तेव्हा त्यापैकी दाढी असलेल्या एकाने फिर्यादीचे कॉलर पकडुन टेम्पोचे खाली ओढुन पकडुन ठेवले व त्याच्या सोबतचे दोन आरोपीतांनी टेम्पोतील पाठीमागील दोरी सोडुन देशी दारू भिंगरी संत्राचे ९६ बॉटल किंमती ५७६०/-रूपयाचा माल जबरीने चोरून नेला. सदर गुन्हा घडल्या नंतर.

पोलीस अधिक्षक प्रमोद शेवाळे, अपर पोलीस अधिक्षक निलेश मोरे, अपर पोलीस अधिक्षक भोकर विजय कबाडे, उप विभागयीय पोलीस अधिकारी चंद्रसेन देशमुख यांनी तात्काळ आरोपी अटक करून गेला माल हस्तगत करण्याच्या सक्त सुचना दिल्या हो त्या. पोस्टे विमानतळचे पोनि संजय एम ननवरे हे स्वतः व गुन्हे शोध पथकाचे अंमलदार पोह. दारा राठोड, पोना.कलंदर, पोका.गंगावरे, तसेच तपासीक अंमलदार पोउपनि. एकनाथ देवके, लोखंडे, गायकवाड यांनी रात्रभर मेहनत घेवुन १२ तासाचे आत गुन्हा उघडकीस आणला आहे. गोपनिय यंत्रणा राबवुन आरोपीतांचा शोध घेवुन तीन आरोपी निष्पन्न करून अटक करण्यात आले असुन सदर आरोपीतांना एक दिवसांची पोलीस कस्टडी मिळाली आहे. कैलास गोविंदराव कोल्हे, वय २५ वर्षे, रा. गोविंदनगर नांदेड अभिजीत उर्फ गोलु सुभाष डाखोरे, वय २० वर्षे, रा. गांधीनगर नांदेड प्रशांत भुजंगराव कांबळे, वय २१ वर्षे, रा. शिवनगर नांदेड यांना ताब्यात घेवुन बारकाईने चौकशी केली असता त्यांचे ताब्यातुन गुन्हयातील वरील देशी दारू भिंगरी संत्राच्या ९६ बॉटल किंमती ५७६०/-रूपयाचा माल हस्तगत केला आहे. अशा प्रकारे पोस्टे विमानतळ यांनी चांगली कामगीरी केलेली आहे.